पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 04/01/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## आंतरराज्यात **ATM** फोडून चोरी करणाऱ्या टोळीतील कुख्यात गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी केली अटक

नागपूर ग्रामीण जिल्हा, नागपूर शहर आणि इतर राज्यांमध्ये वारंवार होणाऱ्या ।ज्ड चोरीच्या घटनेमुळे नागपूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस पथकाकडून मागील बऱ्याच दिवसांपासून ।ज्ड चोरी करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेणे सुरु होते. अश्यातच त्यांना खात्रीशिर माहिती प्राप्त झाली की, ATM फोडणाऱ्या टोळीतील अट्टल गुन्हेगार व नागपूर ग्रामीण व नागपूर शहरातील विवीध पोलीस ठाणे तसेच इतर राज्यातील ATM चोरीच्या घटनेतील फरार आरोपी जगदीश उर्फ गणेश शिवशंकर बाबरे, वय 30 वर्ष, रा. राम मंदीर समोर, बेला तह. जि. भंडारा हा हसनबाग येथे रहात असून तो स्कुलबसवर चालकाची नोकरी करतो अशी माहिती मिळाली. जगदीश याचे बाबत खात्रीशिर माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते यांचे पथकाला आरोपी जगदीश यास ताब्यात घेण्याबाबत आदेशीत केले. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. 04/01/2020 रोजी पहाटे 5.00 वाजता दरम्यान हिरवी ले–आउट, नागपूर येथे सापळा रचला. आरोपी हा अतिशष चपळ व हुशार असल्याने त्यास ताब्यात घेणे पोलीसांसाठी मोठे जिकरीचे असल्याने पहाटे–पहाटे पोलीसांनी मॉर्निंग वॉकच्या कपडयांमध्ये वेशांतर करुन आरोपीचे स्कुलबसचे आसपास सापळा रचला. आरोपी त्याची स्कुलबस घेण्याकरीता येताच पोलीसांनी अतिशय शिताफिने त्यास ताब्यात घेतले. पोलीसांनी त्याला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव जगदीश उर्फ गणेश शिवशंकर बाबरे, वय 30 वर्ष, रा. राम मंदीर समोर, बेला तह. जि. भंडारा ह.मु. व्दार श्री पराते यांचे घरी, आनंद नर्सरीचे बाजूला, कामगार नगर, हसनबाग चौक, नागपूर असे असल्याचे सांगीतले.

पोलीसांनी मानसिक व बौध्दीक चातुर्याचा उपयोग करुन आरोपीस गुन्हयासंबधी विचारपुस केली असता त्याने केलेल्या गुन्हयाची कबुली दिली आहे. तसेच सदर आरोपीने त्याचे इतर साथीदारांसह मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र राज्यातील खालील नमुद पोलीस स्टेशन अंतर्गत ।ज्ड चोरी व चोरीचा प्रयत्न केल्याबाबत कबुली दिलेली आहे.

1) पो.स्टे. अरोली अप.क्र. 02/15 कलम 380, 511, 427 भादवि
2) पो.स्टे. हिंगणा अप.क्र. 07/18 कलम 457, 380 भादवि
3) पो.स्टे. वडसा (गडचिरोली) अप.क्र. 235/2019 कलम 457, 380, 511 भादवि

4) पो.स्टे. कुही अप.क्र. 307/2017 कलम, 379, 427, 511 भादवि

तसेच महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यातील खालील नमुद पोलीस स्टेशनमध्ये नोंद असलेल्या गुन्हयांमध्ये तो फरार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

1) पो.स्टे. कुही जि. नागपूर ग्रामीण (महाराष्ट्र) अप.क्र. 260/2018 कलम, 379, 34 भादवि
2) पो.स्टे. तिरोडी जि. छिंदवाडा (मध्यप्रदेश) गुन्हा रजि.नं. 200/2018 कलम 380, 457 भादवि
3) पो.स्टे. हरई तह. अमरवाडी जि. छिंदवाडा (मध्यप्रदेश)

सदर अरोपी हा अतिशय अट्टल गुन्हेगार असुन त्याने केलेल्या आजपर्यंतच्या गुन्हेगारी कारकीर्दीत तो प्रत्येकवेळी परराज्यातील तसेच महाराष्ट्रातील स्थानिक पोलीसांना हातात तुरी देवून पळून जाण्यात यशस्वी होत होता. परंतू स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीसांनी त्याची गुन्हेगारी कार्यशैली लक्षात ठेवून त्याचा सतत पाठपुरावा करुन त्यास पहील्यांदाच अटक केली आहे. अश्याप्रकारे नमुद आरोपी याचेकडून एकुण 4 गुन्हे उघडकिस आणून 3 गुन्हयात फरार असल्याचे निष्पन्न केले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, जावेद शेख, पोलीस हवालदार राजेन्द्र सनोडीया, ज्ञानेश्वर राऊत, सुनिल मिश्रा, पोलीस नायक दिनेश आधापूरे, पोलीस शिपाई अमोल वाघ, महेश बिसने, सोनू चटप, सतिष राठोड महिला पोलीस शिपाई नम्रता बघेल आणि चालक पोलीस नायक अमोल कुथे यांचे पथकाने केली.



# नागपूर ग्रामीण सायबर सेल तर्फे "Cyber Safe Women" कार्यक्रमाचे आयोजन

नागपूर ग्रामीण पोलीस सायबर सेल कडून पोलीस स्टेशन काटोल अंर्तगत दिनांक 03/01/2020 सायबर सेफ वुमेन कार्यक्रम काटोल शहरातील शिंदे कन्या विद्यालय आणि नबीरा महाविदयालय येथे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात सध्याच्या युगात दिवसेदिवस सर्वच क्षेत्रात इंटरनेटचे जाळे पसरलेले असल्याने तालुक्या पासुन तर विदेशापर्यंत इंटरनेटच्या माध्यमाने संगणक व मोबाईलच्या सहाय्याने जवळीक साधण्याचा त्यांच्याशी संवाद करण्याचा, ऐकमेकांच्या भावना दुसऱ्यापर्यंत पोहोचविण्याचा सपाटा जोराने सुरू झाला आहे. सोशल मिडिया व इंटरनेटचा जसा फायदा आहे तसा गैरफायदा करणारे अपप्रवृत्ति सुदधा उदयास आली आहे. सायबर विषयक गुन्हे करणारे गुन्हेगारांनी झपाटयाने इंटरनेट क्षेत्रात शिरकाव करून लोकांची आर्थिक फसवणुक, मानसिक छळ, लैगिंक अत्याचार इतर विविध सायबर विषयक गुन्हे होतात. सदर सायबर गुन्हयांवर प्रतिबंध करण्यासाठी महिला व बालक तसचे सर्व साधारण जनतेमध्ये जनजागृती करणे साठी महाराष्ट्र पोलीस दला तर्फे "Cyber Safe Women" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात सायबर गुन्हयां बाबत मार्गदर्शन व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याबाबत नागपूर ग्रामीण जिल्हा सायबर सेल कडून मार्गदर्शन करण्यात आले. सदर दोन्ही ठिकाणी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात महाविदयालयचे विदयार्थी, शिक्षक, पालक व प्रतिष्ठीत नागरीक उपस्थिती होते. सदर कार्यक्रम नागपूर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला सर व अतिरिक्त पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे पोलीस निरिक्षक यशवंत कदम, पोलीस उपनिरिक्षक जावेद शेख, पोशि योगेश राजगीरे, मपोना स्नेहलता ढवळे यांनी यशस्वीरित्या पार पाडले.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर